VOL- XI | ISSUE- IV | APRIL | 2024 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 8.02 | ISSN 2349-638x

# चिनी समाज-संस्कृतींचे दर्शन घडविणारी निवडक मराठी प्रवासवर्णने

**प्रा. डॉ. मनिषा झोंबाडे**
सहा. प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख
शिवाजी महाविद्यालय मुरुड, ता.,जि.लातूर

**प्रस्तावना : -**

प्रवासवर्णन हा एक वेगळा साहित्यप्रकार ठरतो तो केवळ त्याच्या गुणवैशिष्ट्यांमुळे. प्रवासवर्णनाची सर्व गुण वैशिष्ट्ये बारकाईने पाहिली तर 'समाज संस्कृती दर्शन' हे गुण वैशिष्ट्य अतिशय महत्वपूर्ण आहे. प्रवासवर्णनकरांनी प्रवास केलेल्या परदेशातील समाजजीवनाचे चित्रण अगदी पारदर्शकपणे घडविले आहे. केवळ समाजातील वास्तविकता सांगण्याच्या दृष्टिकोनातून प्रवासवर्णनांची निर्मिती झाली आहे. कारण प्रवास करणाऱ्या लेखकांच्या अनुभवाचे अनेक संदर्भ समाजाशी निगडित असतात. म्हणून कमी अधिक प्रमाणात का होईना प्रवासवर्णनकार त्या-त्या प्रदेशातील समाज जीवनाचे तपशील मांडत असतो. हे तपशील कधी त्या समाजाच्या चालीरीती, शिक्षण पद्धती, कुटुंब संस्था, कला, मनोरंजन, आहार, व्यापार व क्रीडा आदी बाबींशी संबंधित असतात. प्रत्येक देशाची समाज संस्कृती ही जशी वेगळी असते तशीच चीन या देशाच्या समाज संस्कृतीचे वेगळेपण मराठीतील काही प्रवासवर्णनांनी दर्शविली आहे. चीनमधील समाज संस्कृती दर्शविणाऱ्या अशाच काही निवडक प्रवासवर्णनांचा आढावा घेणे महत्त्वपूर्ण वाटते. म्हणून मराठीतील काही निवडक प्रवासवर्णनांचा अभ्यास इथे केला आहे. ही प्रवासवर्णने चीनच्या सामाजिक व सांस्कृतिक विविधतेचे दर्शन निकटत्त्वाने घडवितात.

सर्वप्रथम विचार करावासा वाटतो तो प्रा. एन.जे. सोनवणे लिखित जपान गाथा (१९८९) या प्रवासवर्णनाचा. अतिशय कलात्मक व महत्त्वपूर्ण असे हे प्रवासवर्णन आहे. कला व मनोरंजनाच्या बाबतीत जपानी समाजाने आपली संस्कृती परंपरा कायम टिकवून ठेवली याची प्रचिती या प्रवासवर्णनाच्या माध्यमातून येते. 'ओरिगामी' ही जपानची वैशिष्ट्ये पूर्ण कला अतिशय सौंदर्यलक्षी अशी आहे. त्यामुळेच जपानी समाजात ही कला अतिशय प्रिय असल्याचे दिसते. यामध्ये कागदाच्या घड्या घालून विविध रंगाचे पक्षी बनविले जातात. या कलेमधील 'त्सुरी'नावाचा पक्षी वैशिष्ट्यपूर्ण मानला जातो. अतिशय सुंदर, मनोहरी अशी ही कला म्हणूनच या कलेविषयी प्रा. एन जे सोनवणे यांनी म्हटले आहे की, "या पक्षाला आयुष्य भरपूर असते. म्हणून आजारी माणसाला भेटायला जाताना किंवा वाढदिवसाच्या आरोग्यदायी दीर्घायुष्याच्या सदिच्छा व्यक्त करण्यासाठी याचा उपयोग करतात. या पक्षाची कागदी प्रतिकृती बनवतात आणि अशा एक हजार प्रतिकृतींनी केलेली माळ सदिच्छा दर्शक म्हणून दिली जाते."१ अशा कलात्मक व सुंदर भाषेमध्ये जपानच्या कलेचे दर्शन प्रा यांचे सोनवणे यांनी घडविले आहे. जपानमध्ये आणखीन जोपासल्या जाणाऱ्या कला म्हणजे शिल्पकला, मोती कला, नृत्य, संगीत, गायन, चित्रकला, फोटोग्राफी, कागद व लाकडापासून बनविलेली विजेरी खेळणी इत्यादी आहेत. विशेषतः जपानमध्ये रंगबेरंगी फुलांची सजावट करून तयार केली जाणारी बोनसा ही वृक्ष संगोपनाची आगळीवेगळी कला अतिशय नावाजलेली अशी कला आहे. त्यामुळे जपानमधील अशा काही नामांकित व वैशिष्ट्यपूर्ण कलांची माहिती प्रा सोनवणे यांनी अतिशय समर्पकपणे दिली आहे. तर जपान मधील समाजाची त्यांच्या मातृभाषेवर निस्सीम प्रेम असल्याचे प्रा. सोनवणे यांनी या प्रवासवर्णनाच्या माध्यमातून सांगितले आहे. जपान हा इतका प्रगतशील देश असतानाही येथे इंग्रजी भाषेपासून काही अडत नाही. संपूर्ण देशाचा कारभार हा जपानी भाषेतच चालतो. प्राथमिक शाळेपासून ते मेडिकल, इंजीनियरिंग व इतर उच्च शिक्षण पद्धतीपर्यंतचे शिक्षण व पुस्तके जपानी भाषेतूनच उपलब्ध असल्याचे दिसतात. या वास्तव्यादरम्यान प्रा.

सोनवणे यांनी काही जपानी शब्दही जाणून घेतलेले आहेत. त्या शब्दांचा उल्लेख त्यांनी प्रवासवर्णनात केला आहे. " 'सुमेमासेन', ' आरीगाते', ' सायोनारा' हे जपानी भाषेतील फार महत्वाचे शब्द आहेत. सुमी मासेन म्हणजे क्षमस्व ( Excuse me), आरे गाते म्हणजे आभारी आहे व सायोनणारा म्हणजे निरोप घेणे ( by by)यतीन शब्दांवर नवीन माणूस जपानी माणसाची बरीच मदत घेऊ शकतो."२ हे जपानीशब्द जपानी माणसाच्या जीवनशैलीमध्ये वारंवार वापरल्याचे दिसतात. यावरून जपानी माणसाची आपल्या मातृभाषेवर असणारी निष्ठा व प्रेम सहजगत्या दिसते. समाज संस्कृती जवळून अनुभवताना प्रा. सोनवणे यांनी जपानी विवाह पद्धतीची माहिती जाणून घेतली. ती विवाह पद्धती त्यांनी आपल्या प्रवासवर्णना मध्ये जाणून-बुजून उल्लेखली आहे. नोंदणी पद्धत किंवा समारंभ पूर्वक अशी जपानी विवाह पद्धती असून त्या विवाह पद्धतीमध्ये व भारतीय विवाह पद्धतीमध्ये साम्यता बरीचशी साम्यता असल्याचे दिसते. भारतीय संस्कृती प्रमाणे जपानी संस्कृतीमध्ये मुला मुलींचे विवाह आई-वडिलांच्या संमतीने व पसंतीनेच केली जातात. जपान मधील तरुण-तरुणी शक्यतो पदवी संपादन करून नोकरी व्यवसायात आपला जम बसवितात. अमाप पैसा कमवतात व नंतर म्हणजे वयाच्या पंचवीव्या ते तिसाव्या वर्षापर्यंत लग्नाच्या बंधनात अडकतात. विशेषतः जपान मधील लग्न समारंभ हा नोंदणी पद्धतीने किंवा समारंभ पूर्व केला जातो. लग्नामध्ये हुंडा घेणे, दागिने घेणे, अवाढव्य खर्च करणे अशा पद्धती टाळून अतिशय शिस्तबद्धपणे हे विवाह पार पडतात. चीनच्या समाज संस्कृती विषयी लिहिताना प्रा.एन. जे.सोनवणे यांनी जपान मधील आहार पद्धतीचे ही दर्शन घडविले आहे. प्रथिनियुक्त आहार पद्धती जपानमध्ये मोठ्या प्रमाणात दिसते. प्रामुख्याने भात व मासे असा पौष्टिक व सकस आहार चिनी लोकांच्या जीवनामध्ये समाविष्ट असतो. त्यामुळे चिनी माणसांची प्रकृती ही मध्यम बांधण्याची असून निरोगी दिसते. म्हणजेच चीनच्या आहाराचा तेथील लोकांच्या प्रकृतीवर ही किती परिणाम होतो हे सोनवणे यांनी येथे स्पष्ट केले आहे. या आहाराविषयी प्रा. एन. जे. सोनवणे म्हणतात की, " जपानमध्ये भात शेती भरपूर आहे. त्यामुळे तिथे तांदूळ विपुल प्रमाणात पिकतो. सुदैवाने आजूबाजूला मासे आहेत. त्यामुळे सकाळी न्याहरीला मासे, दुपारी जेवणाला मासे आणि रात्रीच्या जेवणात देखील मासेच. तिन्ही त्रिकाळ भात आणि मासे त्यामुळे सहजिकच आपल्या एकच प्रकारच्या आहारामुळे जपानी लोक शारीरिक दृष्ट्यांना अजूक व लहानखोर शरीरयष्टीचे झाले आहेत."३ वरील वर्णनातून प्रा सोनवणे यांचे सूक्ष्म निरीक्षण आणि विचार करण्याची क्षमता किती दांडगी आहे याचा प्रत्यय येतो. चिनी समाज संस्कृतीचे दर्शन अगदी कलात्मक रीतीने घडविणारे आणखीन एक प्रवासवर्णन मराठीमध्ये प्रकाशित झाले. अतिशय महत्त्वपूर्ण व अभ्यास युक्त असे गंगाधर गाडगीळ लिखित 'चीन एक अपूर्व अनुभव '(१९९९) हे प्रवासवर्णन होय. मराठीतील चीन प्रवासावर आधारित असणाऱ्या प्रवासवर्णनांच्या यादीत या प्रवासवर्णनास अव्वल दर्जाचे स्थान आहे. गंगाधर गाडगीळ हे अतिशय महत्त्वपूर्ण असे प्रवासवर्णनकार आहेत. म्हणूनच त्यांच्याविषयी प्रवासवर्णन अभ्यासक प्रा. चंद्रकांत वर्तक लिहतात की,

ह्या कालखंडातील गाडगीळांची चारही प्रवासवर्णने आधीच्या कालखंडातील त्यांच्या दोन प्रवासवर्णनांपेक्षा वेगळी होतात. प्रवासवर्णनकारांच्या पंचायतनातच नव्हे, तर एकूण मराठीतील प्रवास वर्णनांत गाडगीळांची प्रवास वर्णने उत्तुंग शिखरांच्या रांगात होतात"४ 'चीन एक अपूर्व अनुभव' या त्यांच्या प्रवासवर्णनाचा विचार करता गंगाधर गाडगीळ यांनी चीनमधील समाज संस्कृती जवळून अनुभवताना तेथील पारंपारिक क्रीडांचेही निकटत्वाने दर्शन घेतले. त्यामुळेच त्यांच्या या प्रवासवर्णनामध्ये चीनमधील ग्रामीण भागात जत्रेतून काही पारंपारिक क्रीडांचे आयोजन केल्याचा उल्लेख आला आहे. यामध्ये कोंबड्याची झुंज, कुस्त्या, शारीरिक कसरती अशा क्रीडांद्वारे चिनी समाज मनोरंजन करतो. यावरून चिनी समाजात आपली कला, परंपरा जोपासण्याची उर्मी लोकांमध्ये मोठ्या प्रमाणात असल्याचे आढळते. चीनमधील कला क्रीडा दर्शविताना गंगाधर गाडगीळ यांनी तेथील एकत्र कुटुंब पद्धतीचे हे दर्शन घडविले आहे. कुटुंब संस्थेच्या बाबतीतही चिनी कुटुंब व्यवस्था ही भारतीय कुटुंब व्यवस्थेची साम्यता दर्शविते हे गंगाधर गाडगीळ या प्रवासवर्णनाच्या माध्यमातून दर्शवितात. चिनी लोकांच्या जीवनात कुटुंब संस्थेला अनन्यसाधारण महत्त्व दिल जाते. या कुटुंब संस्थेमध्ये आई-मुलगी, वडील-मुलगी, बहिणी-बहिणी ही रक्ताची नाती म्हणजे एकमेकांच्या जीवास जीव देणारी नाती आहेत. गंगाधर गाडगीळ यांनी ही नाती जवळून अनुभवली. त्यामुळे त्यांना चिनी लोकांच्या कुटुंबाविषयी

अतिशय आदर व आपुलकी वाटते. वास्तविक पाहता चीनमधील नातेसंबंधांमध्ये त्यांना भावनिक गुंतागुंत जास्त दिसते. याचे उदाहरण गाडगीळ यांनी हाँगजो स्टेशन वरील प्रसंगाच्या माध्यमातून रेखाटले आहे. ते या नातेसंबंध विषयी म्हणतात की, "एक झलक मात्र हाँगजो स्टेशनवर पाहायला मिळाली. आमच्यासाठी दुभाषाच काम करणारी जीए ही मुलगी आली. ही अदलाबदल करणे मागचे एकच कारण असावं की चीनची आई वडील हाँगजो ला राहत होते. तेव्हा कामाच्या निमित्ताने आपल्या आई वडिलांना तिला भेटायला मिळावं असा तिच्या वरिष्ठांचा उदार हेतू असावा.हाँगजोला तिच्यासाठी आमच्या हॉटेलला सोय केलेली होती. पण ती रोज रात्री घरी जात होती आणि सकाळी न्याहारी करून येत होती. आल्यावर आपली आई आपली किती लाड करते, कसं खाऊ पिऊ घालते ते सांगत होती. शेवटी आम्ही हाँगजो सोडायच्या दिवशी तिची धाकटी बहीण तिला निरोप द्यायला स्टेशनवर आली, आणि ती आपल्या बहिणीला मिठी मारून रडतच सुटली. चैनीतीची समजूत काढत होती आणि स्वतः रडत होती. बरं ही बहीण काही लहान नव्हती. ती चांगली चोवीस वर्षांची होती. हा एकंदर प्रकार अपवादात्मक असण्याची शक्यता मला जाणवत होती."५ या वर्णनातून गंगाधर गाडगीळ यांना चीनमधील भावनिक गुंतागुंतीच्या नातेसंबंध विषयी वाटणारी कुतूहलता स्पष्ट दिसते. अतिशय समर्पक रीतीने त्यांनी हा प्रसंग घडविला आहे. अगदी अलीकडेच्या काळात म्हणजे इ. स. २००० नंतर चिनी जीवनाचे दर्शन घडविणारी अनेक प्रवासवर्णने निर्माण झाली आहेत. यापैकी सर्वात महत्त्वाचे प्रवासवर्णन म्हणजे लक्ष्मण गायकवाड लिखित 'चिनी मातीचे दिवस' (२००४) हे होय. या प्रवासवर्णनामध्ये लक्ष्मण गायकवाड यांना चीनच्या वास्तव्यादरम्यान दृष्टीस आलेल्या समाज संस्कृतीचे दर्शन घडते. गायकवाड यांनी या समाज संस्कृती बद्दल अतिशय मार्मिक टिप्पणी करून प्रवासवर्णनाचे वेगळेपण दर्शविले आहे. समाज संस्कृतीतील महत्त्वाच्या घटकांपैकी ' खाद्य संस्कृती' हा घटक स्पष्ट करतेवेळी चिनी माणसाच्या खाजगी आयुष्यात डोकवण्याचा प्रयत्न केला आहे. चीनमधील आंबट गोड असे स्वासयुक्त चायनीज पदार्थ, खमंग कुरकुरीत मासे, पौष्टिक सूप अशा पदार्थांचे दर्शन या प्रवास वर्णनाच्या माध्यमातून त्यांनी घडविले आहे. चीनमधील रुचकर पदार्थ सहावीच्या दृष्टीने अतिशय स्वादिष्ट असल्याने चिनी माणूस आपल्या जिभेचे चोचले सतत पुरवितो. म्हणूनच चीनच्या या खाद्य संस्कृती विषयी लक्ष्मण गायकवाड लिहितात की, " या हॉटेलमध्ये आमच्या टेबलावर वेगवेगळ्या चायनीज सूप खूप पदार्थ आणून ठेवले. कुठल्याही हॉटेलमध्ये गेलो तर पदार्थांची तिथे एक पद्धत होती की, सुरुवातीला बियर किंवा वाईन नंतर वेगवेगळ्या अशा माशांचे पालेभाज्यांचे सूप आणि मुख्य जेवणाची डिश आणि शेवटी स्वीट डिश असा टप्पा राहायचा."६ या वर्णनातून चिनी लोकांच्या अगळ्या वेगळ्या व विशिष्ट आहार पद्धतींचे दर्शन घडते. या आहार पद्धतीमध्ये कुठेही विविधता दिसून येत नाही. केवळ एकच एक म्हणजेच मांसाहार हाच चिनी लोकांचा आहार असल्याचे दिसते. कारण हा आहार पौष्टिक रुचकर, स्वादिष्ट तसेच प्रतिनियुक्त असल्याने तो आरोग्यास लाभदायी अशी चिनी लोकांची विचारसरणी आहे. त्यामुळे चीनमधील महत्त्वपूर्ण आहार म्हणून मांसाहार ओळखला जातो.

अशाप्रकारे मराठी साहित्यातील काही निवडक प्रवासवर्णनांमधून चिनी समाज संस्कृतीचे दर्शन घडविली आहे. चिनी समाज संस्कृती ही भारतीय संस्कृतीशी साम्यता दाखविणारी संस्कृती आहे. या संस्कृतीचा अभ्यास केल्यानंतर अभ्यासांती पुढील निष्कर्ष नोंदविता येतील. सर्वात प्रथम वैशिष्ट्य म्हणजे या प्रवासवर्णनांमधील कला आपापल्या संस्कृती परंपरांचे जतन करणाऱ्या कला आहेत. या कला व मनोरंजन या दोघांच्या माध्यमातून समाजप्रबोधन ही केले जात असल्याचे दिसते. चीन मधील खाद्य संस्कृती ही चीन देशाची खरी ओळख पटविते. खाद्य संस्कृतीच्या माध्यमातून प्रवास वर्णन करांनी चिनी लोकांच्या सुदृढ प्रकृती व शरीरयष्टीचे दर्शन घडविले आहे. चिनी विवाह पद्धतीची भारतीय विवाह पद्धतीशी साम्यता दाखवून चीन आणि भारत या दोन्ही देशाची संस्कृती एकच आहे हे सिद्ध केले आहे.वास्तविक पाहता चिनी समाज संस्कृतीवर भारतीय समाज संस्कृतीचा पगडा जवळजवळ निम्म्यापर्यंत दिसून येतो. चिनी समाज संस्कृती ही आदर्शवादी संस्कृती आहे. ही आदर्शवादी समाज संस्कृती आपल्या प्रवासवर्णनातून या लेखकांनी अतिशय स्पष्ट व मार्मिक शब्दात वर्णन केली आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

१. प्रा. सोनवणे एन. जे., ' जपानगाथा', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९८९, पृ. क्र. ५२-५३

२. प्रा सोनवणे एन.जे., ' 'जपानगाथा', उनि, पृ. क्र ८८.
३. प्रा सोनवणे एन.जे., ' 'जपानगाथा', उनि, पृ. क्र ३९.
४. मराठी वाङ्मयाचा इतिहास, (१९५०ते २०००), खंड सातवा, भाग पहिला, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, प्रथमावृत्ती २००९, पृ. क्र. १७५.
५. गाडगीळ गंगाधर, ' चीन एक अपूर्व अनुभव', सुरेश एजन्सी, पुणे, प्रथमावृत्ती १९९३, पृ. क्र. २१.
६. गायकवाड लक्ष्मण, ' चिनी मातीतील दिवस', दिलीप राज प्रकाशन प्रा लि, पुणे, चतुर्थ आवृत्ती २००४, पृ. क्र. ६६.